मन म्हणजे वेगळे काही नसून बऱ्या – वाईट विचारांची वाहतूक करण्याचे ईश्वराने माणसाला दिलेले एक साधन आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार १८ जुले २०२५ | अंक २०९ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Touriism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक
दिल से दिल तक
1st TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# कशाला आमदार राहायचं? विधानभवनातील हाणामारीनंतर आव्हाड प्रचंड संतापले!

## आई-बहिणीवर शिव्या देण्यात आल्या

अख्ख्या महाराष्ट्राला समजलं आहे की पडळकरांच्या लोकांनी हल्ला केला आहे. आम्हाला यापेक्षा जास्त कोणताही पुरावा द्यायचा नाही. तुम्ही विधानपरिषदेत गुंडांना प्रवेश देणार असाल आणि ते आमच्यावर हल्ले करत असतील तर आम्ही सुरक्षित नाहीयोत, असा त्याचा अर्थ होतो, असा जळजळीत सवाल त्यांनी केला. तसेच मी सुरक्षित नसल्याचे ट्वीट अगोदरच केलेले आहे. मला आई-बहिणीवर शिव्या देण्यात आल्या. तुला मारून टाकू अशी धमकी देण्यात आली. कुत्रा, डुक्कर असं काहीही बोलण्यात आलं, असा गंभीर आरोपही आव्हाड यांनी केलाय.



भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे नेते तथा माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्यातील वाद चांगलाच विकोपाला गेला आहे. आव्हाडांनी दिलेल्या मंगळसूत्र चोर या घोषणेनंतर त्यांचा पडळकर यांच्यासोबतचा वाद वाढला होता. त्यानंतर आता विधानभवनाच्या लॉबीमध्येच पडळकर आणि आव्हाड यांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले आहेत. हा सर्व प्रकार समोर आल्यानंतर जितेंद्र आव्हाड चांगलेच संतापले आहेत. विधिमंडळातच आमदार सुरक्षित नाहीत. असं असेल तर आमदार कशाला राहायचं? असा संतप्त सवाल त्यांनी केलाय हे गुंड विधानभवनात आलेच कसे?

विशेष म्हणजे या प्रकरणाची दखल विरोधकांनी घेतली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीदेखील या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणाची दखल विरोधकांनी घेतली आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीदेखील गंभीर सवाल उपस्थित केले आहेत. विधिमंडळाच्या बाहेर अशा घटना आणि विधिमंडळाच्या प्रांगणात हे प्रकार घडणे यात फरक आहे. हे गुंड विधानभवनात आलेच कसे? त्यांना पास कसा मिळाला? त्यांना पास देणारा आमदार कोण? याबाबत चौकशी झाली पाहिजे? अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केला आहे..

## आमदार सुरक्षित नसतील तर...

विधानसभेत नेमकं काय चालू आहे? मी भाषण करून बाहेर आलो होतो. थोडी मोकळी हवा घेण्यासाठी बाहेर आलो होते. हे गुंड मलाच मारण्यासाठी आले होते. म्हणजे विधानसभेत विधिमंडळाच्या पायऱ्यावर आमदार सुरक्षित नसतील तर कशाला राहायचं आमदार. आमचा गुन्हा काय? असाही प्रश्न आव्हाड यांनी केलाय.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन लढवणार

## इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा; तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे यांचे आवाहन

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकांम ध्ये काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन मैदानात उतरणार असून, पक्षातील सर्व जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांना सोबत घेतले जाणार आहे. त्याचबरोबर नव्याने पक्षबांधणी सुरू असून, इच्छुकांनी आम च्याशी संपर्क साधावा असे आवाहन काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी आदरणीय खासदार सौ. रजनीताई पाटील साहेब , माजी मंत्री अशोकरावजी पाटील साहेब, बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे साहेब , अखिल भारतीय राष्ट्रीय किसान समन्वयक बाबुराव मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद सर्कल, पंचायत समिती गण तसेच गावागावात काँग्रेस पक्षाची बांधणी करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. पक्षातील सर्व जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांना तर संधी मिळेलच परंतु नव्याने पक्षात येऊ इच्छित असलेल्या सर्वांना समान न्यायाने संधी दिली जाईल. त्यामुळे पक्ष संघटनेत काम करण्याची इच्छा असेल किंवा आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून भाग घेण्याची इच्छा असेल अशा कार्यकर्त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहन काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.



# नारायण गडाची बदनामी खपवून घेतली जाणार नाही - जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

बीड (प्रतिनिधी) महाराष्ट्रातील लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगडाविषयी व गुरुवर्य शिवाजी महाराजविषयी काही विश्वस्त व काही लोक जाणीवपूर्वक बदनामी करत असुन गडाची बदनामी करण्याचा प्रयत्न करिता आहेत. आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर



व तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी नगद नारायण गडावर जाऊन शिवाजी महाराज यांची भेट घेतली व त्यांचा सत्कार करुन आशिर्वाद घेतले. यावेळी जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी शिवाजी महाराज यांना सांगितले की, बाबा नारायण गडाविषयी चाललेली बदनामी बघुन मी व्यथित झालो असुन आपल्या भेटीसाठी आलेलो आहे

# भंडारे वस्तीवरून जिल्हा परिषद शाळेत जाण्यासाठी

## विद्यार्थ्यांना करावी लागते ओढ्यातून जीवघेणी कसरत !



किल्ले धारूर / प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाकडू न शिक्षणासाठी मोठा खर्च केला जातो. मात्र शाळेत जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे भंडारी वस्तीवरील २० ते २५ विद्यार्थ्यांना दररोज मोठ्या ओढ्यातून व झाडीतून प्रवास करावा लागतो. यामुळे या विद्यार्थ्यांचे जीवन दररोजच धोक्यात असल्याचे दिसून येते. याबाबत शिक्षणाधिकारी,लोकप्रतिनिधी यांनी दखल घेण्याची मागणी धुनकवाड क्र. १ व धुनकवाड क्र.२ येथील नागरिकांतून केली जात आहे. धारूर तालुक्यातील धुनकवाड क्र. २ येथील जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी कु डलिका तलावाच्या बाजूला असणाऱ्या भंडारे वस्तीवरून विद्यार्थी विद्यार्थिनी दररोज शाळेसाठी पायपीठ करतात.

# पाटोदा पंचायत समितीची कोट्यवधींची नवीन इमारत धुळखात पडुन; येणाऱ्या १५ ऑगस्टला तरी उद्घाटन होणार का?

पाटोदा (प्रतिनिधी) पाच वर्षांपूर्वी बांधून पूर्ण झालेली पाटोदा पंचायत समितीची नवी इमारत अजूनही धुळखात पडून आहे. बीड जिल्ह्यातील बहुतेक पंचायत समित्या नव्या इमारतीत कार्यरत असताना, पाटोदा मात्र तांत्रिक कारणांची ढाल पुढे करत कोट्यवधी रुपयांची इम ारत वापरात आणण्यात अपयशी ठरली आहे. त्यामुळे प्रशासनाच्या नियोजन शून्यतेवर सवाल निर्माण होत आहेत.या इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन अनेक वर्षे उलटली, परंतु अद्याप अधिकृत उद्घाटन झालेले नाही. दरवर्षी नवीन तारखा देऊन ही बाब पुढे ढकलली जात आहे. आता जनतेच्या मनात प्रश्न



आहे - ङ्क्या येणाऱ्या १५ ऑगस्टला तरी या इमारतीचे उद्घाटन होणार का तालुक्यातील नागरीक, ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी व स्थानिक नेते यांच्यातही या मुद्द्यावरून नाराजी वाढत आहे. पाटोदा तालुका विकासाच्या दृष्टीने मागे पडू नये यासाठी ही इमारत तात्काळ सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी होत आहे.एकीकडे जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील इतर पंचायत समित्यांच्या इमारतींचे लोकार्पण मोठ्या उत्साहात केले, तर दुसरीकडे पाटोद्याची इमारत मात्र पावसात ओलसर होत,गंजत व उन्हाळ्यात धूळ खात पडून आहे.या इमारतीच्या वापरा बाबत तांत्रिक अडचणी नेमक्या काय आहेत, त्यावर कोण उपाययोजना करणार, आणि येणाऱ्या १५ ऑगस्टला अखेर उद्घाटन होणार का - हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मुलीच्या लैंगिक छळ प्रकरणी पवार, खाटोकर यांना जामीन!

बीड (प्रतिनिधी) बीड शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुल प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेले विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राला काळीमाप असणाऱ्या या घटनेने राज्यभरात खळबळ उडाली होती. उमाकिरण शैक्षणिक संकुलामध्ये बारावीचे शिक्षण न्यायालयाने पवार आणि खाटोकर या दोघांना जामीन मंजूर केला आहे. जामीन अर्जावर सुनावणी दरम्यान आरोपींच्या वतीने प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. बाळासाहेब कोल्हे यांनी जोरदार युक्तिवाद करत आरोपींना जामीन मिळावा अशी मागणी केली. त्यांना ॲड. गणेश कोल्हे, ॲड. घेत असलेल्या एका विद्यार्थिनीने तिचा पवार आणि खाटोकर यांच्याकडून लैंगिक छळ झाल्याची तक्रार केली होती.त्यानंतर या दोघांना पोलिसांनी मांजरसुंबा परिसरातून अटक करून न्यायालयात हजर केले होते.दोन वेळा पोलीस कोठडी मिळाल्यानंतर त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली होती.गुरुवारी याबाबतीत न्यायालयासमोर आरोपीचे वकील अँड. बाळासाहेब कोल्हे यांनी युक्तिवाद करत जामिनाची मागणी केली. यावर संज्योत महाजन, ॲड. योगेश सुरवसे, ॲड.अभिजीत चौरे, ॲड.धनराज जाधव व ॲड.सोनवणे यांनी सहकार्य केले.

# ज्ञानेश्वरी मुंडेंची खा.सोनवणेंनी घेतली भेट; भाऊ म्हणून पाठीशी राहण्याचा शब्द

## जिल्हा रुग्णालयात सुरु आहेत उपचार, योग्य उपचार करण्याचे डॉक्टरांना सुचना

बीड: परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बुधवारी (दि.१६) सकाळी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयाबाहेर कुटुंबासह आत्म दहनाचा प्रयत्न केला. त्यांच्यावर जिल्हा रूग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून दि.१७ जुलै रोजी सायंकाळी खा.बजरंग सोनवणे यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी तुमचा भाऊ म्हणून मी पाठीशी असून तूम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी मी लढा देईल, असा शब्दही खा.सोनवणे यांनी दिला. परळी येथील व्यापारी मुंडे यांचा ऑक्टोबर २०२३ मध्ये निर्घृण खून झाला होता. या घटनेला आता अठरा महिन्यांहून अधिकचा काळ लोटला आहे पण या प्रकरणी अद्याप कुणालाही अटक झाली नाही. तपासाला विलंब होत असल्याने ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बुधवारी सकाळी कुटुंबासह बीड पोलीस अधीक्षक कार्यालयापुढे अंगावर पेट्रोल



ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी पोलीसांनी रोखले परंतु त्यानंतर त्या गाडीत बसण्यासाठी गेल्या परंतु त्यांनी फ्रुटीच्या बाटलीत असलेले कोणते तरी विषारी द्रव केले आणि त्या जमिनीवर कोसळल्या. यानंतर पोलिसांनी तातडीने त्यांना उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केलेले आहे. दि.१७ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे हे मुंबईहून परतले. त्यांनी केजला न जाता आधी जिल्हा रूग्णालयात धाव घेतली. उपचार सुरू असलेल्या ज्ञानेश्वरी मुंडे यांची त्यांनी भेट घेत अस्तेवाईकपणे चौकशी केली. ताई, तूम्ही आत्महत्या करण्याचा विचार करण्याआधी लेकरांच्या तोंडाकडे बघायचे होते. या लेकरांसाठी खंबिर व्हा, तूम्हाला न्याय देण्यात हे सरकार कमी पडत आहे. परंतु तूमच्या लढाईत मी स्वत: तुमचा भाऊ म्हणून तुमच्या पाठिशी आहे, या लढाईत मी तुमच्या सोबत खांद्याला खांदा लावून लढेल, असा शब्दही त्यांनी यावेळी दिला.
००

माझ कुटूंबच या लोकांनी उध्दस्त केले. मी न्यायासाठी रोज प्रशासनाच्या दारात जाते. सोबत लेकरांना घेवून जाते, तरीही या निर्दयी लोकांना मायेचा पाझर फुटत नाही. गरीबांसाठी न्याय असतो का नाही, हेच कळायला तयार नाही. रोज पोलीस ठाण्यात जाताना लेकरांची शाळा बुडत आहे. अशावेळी माझ्या मनाला प्रचंड वेदना होतात.
**–ज्ञानेश्वरी मुंडे.**

## अन खा.सोनवणेंनी पुसले डोळे

उपचार घेत असलेल्या ज्ञानेश्वरी मुंडे यांची भेट घेवून खा.सोनवणे हे बाहेर पडत असताना ज्ञानेश्वर मुंडे यांच्या आईचीही सोनवणे यांनी भेट घेतली. यावेळी मुंडेच्या आईनी हंबरडा फोडला. माझ्या लेकरांना न्याय द्या, पोलीस काहीच करत नाहीत, असे म्हटले. यावेळी आईचा हंबरडा पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले होते. दरम्यान, सोनवणे यांनी त्यांचे अश्रू पूसत मी तूमच्या सोबत आहे. खचून जावू नका, असा विश्वास दिला.

बीड/महाराष्ट्र
मराठी साहित्य
दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १८ जुले २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

## न्यायवैद्यकाची मदत

एखाद्या आरोपीला अटक झाली म्हणजे तो गुन्हेगार ठरत नाही. संबंधिताविरोधातील न्यायालयात साक्षीपुरावे, परिस्थितीजन्य पुरावे सापडले तरच त्याला शिक्षा होऊन त्याच्या कपाळावर गुन्हेगारीचा शिक्का लागतो. साक्षीदार उलटल्याने आरोपी सुटल्याची प्रकरणे नवीन नाहीत. अलीकडच्या काळात तांत्रिक तपासाआधारे आरोपीला पकडल्याची उदाहरणे समोर येतात. त्यामुळेच, तांत्रिक तपासाचा भाग हा न्यायालयात पुरावे म्हणून फॉरेन्सिक लॅबकडून मागविला जातो. काळाच्या ओघात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये बदल होताना दिसतो. त्यातून फॉरेन्सिक लॅबचे महत्त्व खूप वाढल्याचे दिसते. गुन्ह्यांचा तपास करताना वैज्ञानिक, तांत्रिक पद्धतीचा उपयोग करून, गुन्हेगारांना पकडणे आणि त्यांना शिक्षा देणे हे पोलीस यंत्रणांपुढे मोठे आव्हान असते. त्यामुळे फॉरेन्सिक लॅबच्या माध्यमातून गुन्ह्यांच्या ठिकाणी सापडलेल्या पुराव्यांचे विश्लेषण करून गुन्हेगारांपर्यंत पोहोचायला पोलिसांना मदत होते. डीएनए चाचणी, बोटांचे ठसे, शस्त्रे आणि इतर पुराव्यांचे विश्लेषण करून गुन्ह्याची उकल केली जाते. फॉरेन्सिक लॅबचे निष्कर्ष न्यायालयात महत्त्वाचे मानले जात असल्याने योग्य पुरावे, विश्लेषणामुळे न्यायालयाकडून गुन्हेगारांना शिक्षा देण्यास हेच तांत्रिक पुरावे कारणीभूत ठरतात. फॉरेन्सिक लॅबमध्ये सातत्याने नवीन तंत्रज्ञान आणि पद्धती विकसित होताना दिसत आहे. महाराष्ट्रात देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर न्यायसहाय्यक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. आधुनिक सायबर प्रयोगशाळांसह मोबाईल न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत. तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता येत्या काळात लोकाभिमुख पद्धतीचा अवलंब करून न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारकडून जे प्रयत्न सुरू आहेत, ते स्वागतार्ह आहेत. फॉरेन्सिक सायन्स म्हणजे गुन्ह्याचा तपास करताना वापरावे लागणारे एक शास्त्र. जेव्हा एखादा गुन्हा घडतो, तेव्हा त्या ठिकाणी (गुन्ह्याच्या ठिकाणी) अनेक प्रकारचे पुरावे, खुणा सुटलेल्या असतात. या खुणा किंवा पुरावे म्हणजे काहीही असू शकते, अगदी काहीही. जसे की – रंग, रक्त, माती, गुन्हेगाराची किंवा बळी गेलेल्या अज्ञात व्यक्तीची थुंकी, शारीरिक घटक, डिजिटल पुरावे, हाडं, कागदपत्रं, बोटांचे ठसे इत्यादी. गुन्हा ज्या ठिकाणी घडला, त्या ठिकाणी वर नमूद केल्याप्रमाणे असे कोणत्याही प्रकारचे पुरावे किंवा खाणाखुणा सापडल्या असतील, तर रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि भौतिकशास्त्र यांच्या सहाय्याने ते पुरावे शोधणं आणि त्यांचा आढावा घेण्याचे काम फॉरेन्सिक सायन्स करते. गुन्हेगाराला पकडून देण्यासाठी मदत करण्यात फॉरेन्सिक सायन्सचा वाटा मोठा आहे. त्याचबरोबर न्यायालयात या शास्त्रशुद्ध पुराव्यांच्या आधारे गुन्हेगारांना शिक्षा मिळवून देण्याचे कामही याच फॉरेन्सिक सायन्सच्या मदतीने होते, म्हणजेच न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेची महत्त्वपूर्ण भूमिका ठरत आहे. महाराष्ट्रात पहिली न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा मुंबईत १९५८ साली सर जे.जे. रुग्णालयात सुरू करण्यात आली. आज राज्यात न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय येथे कार्यरत असून, सांताक्रूझ कलिना येथे त्याचे मुख्य कार्यालय आहे. न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र ही एक बहुशास्त्रीय संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नांदेड आणि कोल्हापूर येथे सात प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि चंद्रपूर, धुळे, रत्नागिरी, ठाणे आणि सोलापूर येथे पाच लघू न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा आहेत. आंतरराष्ट्रीय मानकांच्या अतिविशिष्ट आणि तर्कसंगत पायाभूत सुविधांनी सुसज्ज अशी गुन्ह्याशी संबंधित कोणतीही आव्हानात्मक वैज्ञानिक कामे करण्यास या प्रयोगशाळा सध्या आहेत

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानची सचिवपदाची सूत्रे महंत तुकाराम महाराज भारती यांच्या हाती.

### बेलेश्वर संस्थान चे रत्न तुकाराम महाराज भारती आहेत – लक्ष्मण महाराज मेंगडे

### बेलेश्वर महाराज संस्थानला महाराष्ट्रात घेऊन जावे – प्रकाश महाराज बोधले

### महंत तुकाराम महाराज भारती यांची पेढेतुला

लिंबागणेश – दि– १७ (प्रतिनिधी) बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगावची सचिव पदाची सूत्रे महंत तुकाराम महाराज भारती यांच्या हाती सोपवण्यात आले आहेत. त्यांची निवड व अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून संस्थांवर भव्य किर्तन सोहळा संपन्न झाला. सुप्रसिद्ध कीर्तनकार एकनाथ महाराज गाडे यांचे सुंदर किर्तन झाले या कार्यक्रमाला महंत महादेवानंद भारती महाराज,श्री ह भ प महंत प्रकाश महाराज बोधले, श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प महंत जनार्दन महाराज शिंदे, श्री महामंडलेश्वर १००८ स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी, वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवे बापू , महंत धर्मराज महाराज सामनगावकर, ताल मार्तंड केशव महाराज जगदाळे गुरुजी,श्री ह भ प भक्तीदास महाराज शिंदे,भागवताचार्य प्रेमानंद महाराज नगरकर , श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, श्री ह भ प नवनाथ महाराज नाईकवाडे, श्री ह भ प अंगद महाराज सातपुते, रंजीत महाराज शिंदे यांच्यासह महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार गायक वादक मंडळी व हजारो भाविक उपस्थित होते..लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे महान तपोनिधी साधू श्री १००८




ईश्वर भारती महाराज यांच्या परंपरेचे रत्न महंत तुकाराम महाराज भारती यांच्याकडे संस्थांच्या सचिव पदाची सूत्रे सोपवण्यात आली आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त एक दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील सर्व भाविक मंडळी उपस्थित होते. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार एकनाथ महाराज गाडे यांचे सुश्राव्य हरिकीर्तन संपन्न झाले, त्यानंतर अभिष्टचिंतन सोहळ्याला सुरुवात झाली, सुरुवातीला पेढे तुला करण्यात आली, त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महंत तुकाराम महाराज भारती यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त भव्य सत्कार करण्यात आला, यावेळी महादेवानंद भारती यांचाही सत्कार करण्यात आला.यावेळी मनोगत व्यक्त करताना श्री ह भ प्रकाश महाराज बोधले म्हणाले की बेलेश्वर संस्थानचे अध्यात्मच सोन सांभाळणारा श्रेष्ठ असतो.महंत महादेवानंद भारती महाराज यांनी हे सांभाळून ठेवला आहे. महंत तुकाराम महाराज यांनी बेलेश्वर संस्थांची महती महाराष्ट्रभर घेऊन जावी अशी अपेक्षा व्यक्त केली. बेलेश्वर संस्थान हे सोनं आहे त्या कोंदणात महंत तुकाराम महाराज यांच्यासारखे रत्न मिळाल. तुकाराम महाराजांनी संस्थांची सेवा केली दिंडी तसेच भाविकांना एकत्रित करण्याचे काम केले आहे अगोदर सेवा केली त्यानंतर कारभार हाती सोपवला..भाविक भक्तांनी ही संस्थांच्या वाटचालीमध्ये सर्वांनी सहकार्य करावे. सर्व मान्यवर संतांचे आशीर्वाद तुकाराम महाराज भारती यांच्या पाठीशी आहेत. अशा भावना महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी व्यक्त केल्या.सेवाभावातून बेलेश्वर संस्थांची महती आणि विकासही मोठ्या प्रमाणात झालेला आहे. निस्वार्थपणाने परमार्थासाठी जीवन समर्पित करणारे महात्मे मिळाल्याने देवस्थानची वाटचाल योग्य दिशेने सुरू आहे.. असं श्री महामंडलेश्वर १००८ स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी यांनी सांगितलं. सर्व संत महंत मान्यवरांच्या आशीर्वादानंतर महंत तुकाराम महाराज भारती यांनी सर्व उपस्थित यांचे आभार मानले व सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश ठोसर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिसरातील तरुण मंडळी, मोठे कष्ट घेतले. कार्यक्रमासाठी परिसरातील सर्व गावचे सरपंच प्रतिष्ठित मंडळी आणि भक्त मंडळी उपस्थित होते..

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# आरोग्य विषयक जनजागृतीचा नवा अध्याय..!

### अंबाजोगाईत मोफत त्वचारोग शिबिरात १२७ गरजू रूग्णांचे निदान व उपचार

अंबाजोगाई (प्रतिनिधी) जागतिक त्वचारोग दिनानिमित्त शहरात प्रथमच आयोजित नि:शुल्क त्वचारोग निदान, उपचार व औषधी वाटप शिबिराचे आयोजन भारतीय त्वचारोग संघटनेकडून (आयए–डीव्हीएल) करण्यात आले होते. या शिबिरात १२७ गरजू रूग्णांची मोफत तपासणी, निदान व उपचार करण्यात आले. या अनोख्या उपक्रमाबद्दल अधिक माहिती देताना जिविका स्किन हेअर व लेझर सेंटर, मुळे हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. जिगिषा मरवाळे – मुळे (एम.डी.स्किन) यांनी सांगितले की, जागतिक त्वचारोग दिनानिमित्त रविवार, दिनांक १३ जुलै रोजी एकाच वेळी देशातील विविध भागात एकूण ८०० नि:शुल्क त्वचारोग व औषधी वाटप शिबिरांचे आयोजन भारतीय त्वचारोग संघटनेकडून (आयए डीव्हीएल) करण्यात आले होते. गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये याची नोंद व्हावी यासाठी या उपक्रमाचा तपशील त्यांना पाठविण्यात आला आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून अंबाजोगाई येथील जिविका स्किन हेअर व लेझर सेंटर, मुळे हॉस्पिटल येथे शहरात प्रथमच इंडियन असोसिएशन ऑफ डमटोलॉजिस्टस व्हेनरियोलॉजिस्टस ऍण्ड लेप्रोलॉजिस्टस



(आयए–डीव्हीएल) या त्वचा रोग तज्ज्ञांच्या राष्ट्रीय संघटनेमार्फत आयोजित मोफत त्वचारोग शिबिरात तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांकडून १२७ गरजू रूग्णांचे निदान व उपचार करण्यात आले. डॉ.मुळे पुढे म्हणाल्या की, सदर उपक्रमाअंतर्गत देशभरातील एक लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली. आजपर्यंत एकाच दिवशी मोफत शिबीराच्या माध्यमातून केलेली ही विक्रमी रूग्ण व शिबीरांची संख्या आहे. सदर उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये त्वचेच्या आजाराची जनजागृती करण्यात आली. दरम्यान त्वचारोग अभ्यासक्रमात त्वचा, नख, केस, सौंदर्य, लैंगिक आजार समस्या हे विषय इत्यंभूत आहे. परंतु, हल्ली कुणीही या विषयाचा संबंध नसतांनाही नागरिकांना विशिष्ट क्रिमचा सल्ला देतो. दरम्यान कुठलेही चुकीचे क्रिम लाऊन मुत्रपिंडावरही त्याचा परिणाम शक्य आहे. या औषधी डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय देता येत नाहीत. परंतु, सर्रास त्या औषधी नागरिकांपर्यंत पोहचतात. त्यामुळे नागरिकांमध्ये गंभीर परिणाम ही बघायला मिळत आहेत. हा प्रकार थांबविण्यासाठी ही या जनजागृतीपर उपक्रमासह मोफत शिबीर व औषधोपचार उपक्रमाची मदत होणार असल्याचे ही डॉ.मुळे यांनी सांगितले. चुकीचे क्रिम वापरल्याने त्वचा पातळ होणे (शोष), स्ट्र ेच मार्क्स, रोसेसिया, पुरळ, पेरीओरलसह इतरही गंभीर समस्या उद्भवण्याचा धोका असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. हल्ली स्वयंघोषित, बोगस त्वचारोग तज्ज्ञांचा सुळसुळाट झाला असल्याचे सर्वत्र बोलल्या जात आहे. जाहिरातीत हे तथाकथित व्यक्ती सर्रास त्वचारोग बरा करण्याशी संबंधित दावा करतात. परंतु, त्यांच्याकडे त्वचारोग तज्ज्ञांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हताही नाही. देशात अशा खोट्या, फसव्या जाहिरातींवर प्रतिबंध घालणारा कायदा नसल्यानेच हे होत असावे. परंतु, हा प्रकार म्हणजे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळणे आहे. त्यामुळे या विषयाकडे गांभिर्याने बघण्याची गरज असल्याचेही डॉ.जिगिषा मुळे यांनी सांगून योग्य त्वचा रोग तज्ज्ञ कसे ओळखावेत. त्यांच्याकडूनच त्वचा विकारांवर उपचार करावेत. त्याचे फायदे. तर बोगस स्वयंघोषित कॉस्मेटोलॉजिस्ट यांच्याकडून उपचार केल्यास होणारे दुष्पपरिणाम या बाबतची माहिती आणि योग्य सल्ला या मोफत निदान व शिबिरांतून १२७ गरजू रूग्णांना देण्यात आला.

# नफरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी गिरवला लोकशाहीचा धडा

# शालेय मुख्यमंत्री पदासाठी केले मतदान

प्रतिनिधी / पाटोदा पाटोदा तालुक्यातील आय एस ओ मानांकित जि.प.प्रा.शा.नफरवाडी येथे शालेय मुख्यमंत्री पदाची निवडणूक ईव्हीएम मशीनच्या सहाय्याने घेण्यात आली.या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरणे,मतदार यादी प्रसिद्ध करणे,अर्जाची छाननी करणे, सूचक,अनुमोदक,अपूर्ण अर्ज बाद करणे,अर्ज मागे घेणे, प्रचार करणे या सर्व बाबी करण्यात आल्या. मतदान कक्ष,मतदान अधिकारी, मतदान प्रतिनिधी नेमण्यात आले.शेवटी मतदान घेवून निकाल जाहीर करण्यात आला. या उपक्रमातून लोकशाहीचा प्रत्यक्ष अनुभव सर्व विद्यार्थ्यांनी घेतला. भारतीय लोकशाहीतला प्रौढ मताधिकार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजला, योग्य उमेदवार निवडणे,प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत भाग घेणे इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करणे या जबाबदाऱ्यांची अनुभूती विद्यार्थ्यांना आली. आई–वडील




किंवा घरातील इतर प्रौढ व्यक्ती मतदान करतात मग ती प्रक्रिया कशी असेल ? विद्यार्थ्यांचा मनातील या जिज्ञासेचे उत्तर स्वतः विद्यार्थ्यांना कृतीतून मिळाले. प्रत्यक्ष निवडणुकीप्रमाणे शाळेतील शिक्षकांच्या संकल्पनेतून शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक घेण्याचे नियोजन केले या मध्ये ॲप च्या माध्यमातून ईव्हीएम मशीन तयार करण्यात आले त्यावर उमेदवारांचे नाव आणि फोटो ऍड करून बॅलेट आणि कंट्रोल युनिट तयार करण्यात आले.इच्छुक उमेदवारांना प्रचारासाठी दोन दिवस वेळ देण्यात आला. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अभिरुप मतदानाचे प्रात्यक्षिक दाखवून मतदान प्रक्रिया समजावून सांगण्यात आली.या निवडणुकीसाठी ९ उमेदवार आणि शेवटी **NOTA** अशी रचना शीं वर करण्यात आली होती.सदरील ईव्हीएम वर आजची मतदान प्रक्रिया पार पडली. शाळेतील सर्व विद्यार्थी,शिक्षक यांनी सहभाग घेतला.एकूण मतदान ११८ झाले.शेवटी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सर्व उमेदवार व मतदान प्रतिनिधी यांच्यासमोर मतमोजणी करून निकाल जाहीर केला, शाळेतील विद्यार्थिनी चैताली बाळू ढोले हिला ६० मतदान झाले तिला ४८ मतांनी विजेता घोषित करण्यात आले.तद्नंतर शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी नवनिर्वाचित मुख्यमंत्री चैताली हिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.चैताली ढोले हिने आपले मनोगत व्यक्त करून सर्व मतदारांचे आभार व्यक्त केले.या निवडीनंतर सर्व विद्यार्थ्यांनी तु चाल पुढं तुला रं गड्या भिती कशाची या गीतावर ठेका धरत नृत्य करत आनंद साजरा केला. उमेदवार म्हणून चैताली ढोले,सोहम मंडलिक,जयराम वाघ,विठ्ठल दराडे,दिपाली ढोले,दर्शन मंडलिक,काजल दराडे,राधिका मंडलिक, भूमिका मंडलिक हे होते. प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेमध्ये केंद्राध्यक्ष सोहम वायकर आणि श्रेयस ढेरे,मतदान अधिकारी १ आरती सवासे,मतदान अधिकारी २ सविता मुळे,मतदान अधिकारी ३ कल्याणी तळेकर तसेच मतदान प्रतिनिधी म्हणून समृद्धी तांबे,सुजाता सस्ते,साक्षी तांबे,महेश दराडे यांनी कामकाज केले.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शाळेचे मुख्याध्यापक अण्णासाहेब खंडागळे सर तसेच शाळेतील शिक्षक सचिन राऊत सर, रमेश मुरूमकर सर,शकुंतला काकडे मॅडम,सारिका वावरे मॅडम यांनी काम पाहिले.

प्रत्यक्ष मतदान करून बुथच्या बाहेर आल्यावर प्रौढ मतदारांनाही होणार नाही एवढा आनंद या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. शाळेत शिकवलेला प्रौढ मताधिकार बजावताना विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची अनुभवासी सांगड घालण्याचे काम या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले.

**मुख्याध्यापक अण्णासाहेब खंडागळे**
**जि.प.प्रा.शा.नफरवाडी ता.पाटोदा जि.बीड**

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता
दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १८ जुले २०२५
https://lokaarambh.com


## कित्येक सरपंच आले... गेले... पण लिंबागणेशला पिण्याचे पाणी अद्यापही नाही!

लिंबागणेश प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद सर्कल म्हणून ओळखले जाणारे लिंबागणेश हे गाव आजही पाण्याच्या टंचाईने होरपळत आहे. तब्बल २० ते २५ वर्ष उलटून गेली, अनेक सरपंच आले-गेले, हजारो आश्वासने देण्यात आली, कोट्यवधी रुपयांचा निधी वापरला गेला, मात्र गावाला पिण्यासाठी शाश्वत पाणी मिळाले नाही, ही वस्तुस्थिती आहे. गावातील शेकडो कुटुंबांना आजही पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागते. विशेष म्हणजे पाणीपुरवठा योजनेच्या नावाखाली आतापर्यंत लाखो रुपयांचे कामे झाली आहेत, तरीही गावाला एक थेंबही शाश्वत पिण्यासाठी पाणी मिळालं नाही हे दुर्दैव नव्हे का? गावात पिण्याच्या पाणीटंचाईचा प्रश्न केवळ उन्हाळ्यातच नव्हे तर संपूर्ण वर्षभर असतो. कारण पिण्यासाठी गावात पाणीच नाही.महिला व मुलींना लांब अंतरावरून पाणी आणावे लागते. अनेकदा या पाण्याची गुणवत्ता सुद्धा शंका निर्माण करणारी असते. ग्रामस्थ आता विचारत आहेत, शासनाचा आणि स्थानिक प्रशासनाचा पाणीपुरवठ्याच्या बाबतीत नेमका अडथळा काय? विकासकामे कागदावरच होतात, प्रत्यक्षात मात्र लिंबागणेश आजही तहानलेलेच आहे.

## लोकनेते सोळंके सहकारी साखर कारखाना स्थळी वृक्षारोपन



माजलगाव-प्रतिनिधी लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर तेलगाव ता.धारुर जि.बीड येथे दि.१६/०७/२०२५ रोजी केंद्र संचालक मा.श्री.आर. सी. बडगुजर साहेब यांचे प्रमुख उपस्थितीत, मा. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड श्री. देशमुख व्ही.ए. यांचे हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी मा. चेअरमन साहेब, मा. व्हाईस चेअरमन साहेब व कार्यकारी संचालक यांचेही हस्ते वृक्षारोपन करणेत आले. शासनाचे एक पेड माँ के नाम मोहिमे अंतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय सहकार दिनाचे औचित्य साधून कारखान्याचे जेष्ठ संचालक मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब व कारखान्याचे मार्गदर्शक मा. श्री. धैर्यशीलकाका सोळंके साहेव यांचे अध्यक्षतेखाली व मा.चेअरमन साहेब श्री. विरेंद्रदादा सोळंके, मा.व्हाईस चेअरमन साहेब श्री. जयसिंगभैय्या सोळंके व कारखान्याचे कार्यकारी जार्गातक पर्यावरणाचा समतोल तसेच भावी पिढीच्या उज्वल भवितव्यासाठी सामाजिक बांधिलकी तसेच केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या वृक्ष लागवड व संवर्धन उपक्रमा अंतर्गत कारखाना दरवर्षी कारखाना परिसरात वृक्ष लागवड करीत असुन आतापर्यंत कारखाना परिसरात एकुण ११७०९ झाडे लावणेत आलेली असुन ती चांगल्या पध्दतीने जोपसलेली आहेत. या कार्यक्रमास कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.आर.सी. बडगुजर, जनरल मॅनेजर (आसवणी) श्री.डी.एम. वरे, जनरल मॅनेजर (इंजि.) श्री.एस.एस. शिनगारे, मुख्य शेतकी अधिकारी श्री. आर. आर. देशमुख, सचिव श्री. सुरेश लगड, चिफ अकोटंट श्री.एस.बी. घाडगे, चिफ केमीस्ट श्री.बी. एस. झोडगे, मार्केटींग मॅनेजर श्री. जुनेद बागवान, पर्यावरण अधिकारी श्री.डी.डी.पोपळे, पर्चेस ऑफिसर श्री.जे.एन. पाटील, सिव्हील इंजिनिअर श्री.डी.बी.मोरे, कारखान्यातील सर्व कर्मचारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थीत हा



बीडः राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुंबई येथील प्रदेश कार्यालयात नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे यांची भेट घेऊन पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अनेक सहकारी मित्र उपस्थित होत

## संचमान्यता व विद्यार्थ्यांचे लाभ देण्यासाठी ३० संप्टेबर हाच निकष कायम ठेवावा ; मराठवाडा शिक्षक संघाची मागणी!

जालना / प्रतिनिधी (दिनांक १७ जुलै) शाळांना संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांर्तगत मिळणारे लाभ देण्यासाठी ३० संप्टेबर हाच निकष कायम ठेवावा त्यात बदल करू नये असी मागणी मराठवाडा शिक्षक सरचिटणीस राजकुमार कदम यांनी राज्याचे शिक्षण आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. राजकुमार कदम यांनी याबाबत दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की,आतापर्यंत शिक्षक संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमा अंतर्गत मिळणारे लाभ हे ३० संप्टेबरच्या पटसंख्येवर दिले जातात परंतु राज्याचे शिक्षण आयुक्त यांनी २६ जून २०२५ रोजी शिक्षणाधिकारी यांच्या बैठकीत यावर्षी पासून शिक्षक संचमान्यता व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमा अंतर्गत देण्यात येणारे लाभ देण्यासाठी ३० संप्टेबरच्या विद्यार्थी पटाऐवजी ३१ जुलै च्या पटावर संचमान्यता व लाभ देण्याचे सुचित केले आहे.हा संदर्भ देऊन शिक्षणाधिकारी (मा.) बुलढाणा यांनी तसे आदेश त्यांच्या जिल्ह्यातील मुख्याध्यापकांना निर्गमित केले आहेत.तसे आदेश राज्यातील शिक्षणाधिकारी आप आपल्या जिल्ह्यात निर्गमित करतील त्या अगोदरच आपण मराठवाडा शिक्षक संघाच्या या निवेदनाचा विचार करावा कारण पंधरा जूनला शाळा सुरू होतात. त्यानंतर एक ते दीड महिना विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया सुरू राहते. त्यानंतर सर्व प्रवेशीत विद्यार्थ्यांची जनरल रजिस्टरला नोंद घेणे, विद्यार्थी प्रमोशन, युडायस, सरलला अपडेट करणे,आधार अपडेट करणे या सर्व ऑनलाईन प्रक्रिया होवून शाळेचा पट तयार होते. ही सर्व प्रक्रिया ३१ जुलै पर्यंत पुर्ण होणे शक्य नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. परिणामी शाळेची पटसंख्या आणि आधार अपडेट व सर्व ऑनलाईन प्रक्रिया होवून शाळेची ऑनलाईन पटसंख्या यात तफावत राहणार आहे. त्यामुळे पटसंख्या असूनही सर्व ऑनलाईन प्रकिया पुर्ण न झाल्यामुळे शिक्षक अतिरिक्त होण्याचा आणि विद्यार्थी लाभापासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी, शाळा व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे गंभीर प्रश्न निर्माण होणार आहेत. ते टाळण्यासाठी संचमान्यता व विविध उपक्रमांतर्गत लाभ पुर्वी प्रमाणेच ३० सप्टेबर च्या पटसंख्येवरच कायम ठेवावेत गंभीर समस्या व अप्रिय घटना टाळाव्यात असे राजकुमार कदम यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## हृदय रोगाशी संबंधित आजार असलेल्या ९५ बालकांची टुडी ईको तपासणी हृदय शस्त्रक्रियेसाठी पात्र २४ बालकांवर लवकरच मुंबई येथे उपचार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत आयोजित शिबिरात हृदयाचे आजार असलेल्या बालकांची २ डी इको तपासणी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालय नांदेड येथे नुकतीच करण्यात आली. या शिबिरात नांदेड जिल्ह्यातील एकूण ९५ बालकांची तपासणी करण्यात आली असून बालाजी हॉस्पिटल मुंबई येथे मोफत हृदय शस्त्रक्रियेसाठी पात्र एकूण २४ बालकांची शस्त्रक्रिया ऑगस्ट महिन्यात करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चंद्रशेखर अप्पनगिरे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे यांच्या नेवृत्वात्वाखाली



हृदयाचे आजार असलेल्या सदृश्य बालकांची २ डी इको तपासणी करण्यात आली. ही तपासणी बालाजी रुग्णालय, मुंबई येथील लहान मुलांचे हृदयरोग तज्ञ डॉ. जयश्री मिश्रा आणि रुग्णालयाचे व्यवस्थापक प्रतिक मिश्रा ह्या विशेषज्ञांच्या मार्फत पार पडले. राज्यात शालेय आरोग्य तपासणी हा कार्यक्रम यशस्वी ठरल्यामुळे व कुपोषणाचा प्रश्न गंभीर असल्यामुळे आणि बाल मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने नांदेड जिल्ह्यातील ४५ आरोग्य पथकांद्वारे वर्षातून २ वेळा अंगणवाडीतील व १ वेळा शाळेतील बालकांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. शुन्य ते १८ या वयोगटातील बालाकंची ४-ऊम्हणजे जन्मतः व्यंग, पोषणमुल्यांची कमतरता, शारीरक व मानसिक विकासात्मक विलंब, आजार यांचे निदान व उपचार करण्यात येतात. हृदयरोग तपासणी, नेत्ररोग, आकडी/फेफरे यांची मोठ्याप्रमावर शिबिरे आयोजित करून निदान व औषधोपचार करण्यात येते. जिल्ह्यातील अनेक मुला-मुलींना या कार्यक्रमांचा मोफत लाभ झालेला असून त्यात अनेक जणांवर हृदय शस्त्रक्रिया व इतर शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत. जिल्ह्यातील अंगणवाडी तपासणी दरम्यान कुपोषित बालकांना निदान व औषधोपचार करून श्रेणीवर्धन करण्यासाठी पोषण पुनर्वसन केंद्र स्त्री रुग्णालय श्यामनगर नांदेड संदर्भित करण्यात येऊन त्यांच्या पालकास बुडीत मजुरीचा लाभ देण्यात येतो. तसेच जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्र अंतर्गत शुन्य ते ६ वर्ष वयोगटातील ज्या बालकांना जन्म जात आजार, अवयवांच्या उणीवा आणि विकास/वाढीचा अभाव आढळल्यास त्यांच्यावर वेळीच शस्त्रक्रिया/औषधोपचार करून भविष्यात त्यांना शरीराच्या गुंतागुंतीच्या आजार किंवा उणीवापासून दूर ठेवणे शक्य होत आहे. या शिबिरासाठी (आर.बी.एस.के) जिल्हा समन्वयक अनिल कांबळे, डी.ई.आय.सी चे) व्यवस्थापक विठ्ठल तावडे,राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत असलेले वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## खालापुरी येथे छत्रपती शिवाजी महाराजल महाराज व समाधान शिबिर संपन्न

बीड ।प्रतिनिधी खालापुरी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराज व समाधान शिबिर संपन्न झाले.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून उपविभागीय अधिकारी श्रीमती कविता जाधव मॅडम उपजिल्हाधिकारी तसेच शिरूर कासार तालुक्याचे तहसीलदार श्री.सुरेश घोळवे साहेब, मंडळ अधिकारी महसूल मंडळातील सर्व सज्जांचे तलाठी, महसूल विभागाचे सर्व कर्मचारी आणि पंचक्रोशीतील सरपंच,उपसरपंच, ग्रामस्थ,शेतकरी बांधव उपस्थित होते. या अभियानांतर्गत वारसा हक्काने वारसांच्या जमीन निशुल्कपणे नावावर करण्यास सुलभता यावी यासाठी जिवंत सातबारा मोहीम, निराधार आणि वृद्ध नागरिकांसाठी संजय गांधी व श्रवण बाळ योजनेबद्दल ची माहिती, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत ज्या शेतकऱ्यांच्या नावावर सन्मान निधी येत नाही त्यांच्या तांत्रिक प्रश्नांची सोडवणूक करणे, जातीचे असेच उत्पन्नाचे दाखले वितरण कार्यक्रम, रेशन धारकांना रेशन मिळत नसल्यास त्यासंदर्भात च्या तक्रारी त्याचप्रमाणे रेशन कार्ड मध्ये नाव समाविष्ट करणे, विभक्त करणे या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण महाराष्ट्र मध्ये अत्यंत ज्वलंत प्रश्न असणारे शेती रस्ते व त्यांचे नकाशातील वाचन या विषयावरती तालुक्याचे तहसीलदार श्री.घोळवे साहेब यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे अध्यक्षीय भाषणामध्ये जिल्ह्याच्या उपविभागीय अधिकारी श्रीमती जाधव मॅडम यांनी बदललेल्या कृषी धोरणाच्या अनुषंगाने तसेच महसुली प्रश्नांवर सखोल मार्गदर्शन उपस्थित शेतकऱ्यांना केले. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळालेल्या लाभार्थ्यांना वाळूची उपलब्धता कशा पद्धतीने करता येईल यासंबंधी मार्गदर्शन करत येणाऱ्या काळात सर्व लाभार्थ्यांना मोफत वाळू पुरवठा करण्याबद्दलचे महसूल प्रशासनाला आदेश दिले .या कार्यक्रमाचे प्रस्ताविक खलापुरी गावचे सरपंच श्री गणेश कल्याणराव घोलप यांनी केले तर संचालन खालापुरी महसूल मंडळाचे मंडळाधिकारी श्री.केकान साहेब यांनी केले व शेतकऱ्यांनी आपापल्या महसूल विषयक प्रश्नांची सोडवणूक कशा पद्धतीने करता येईल यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना प्रश्न विचारून समस्येचे निराकरण करण्यात आले. त्यानंतर सदरील अभियानाचा समारोप खालापुरी येथील बाजार तळावर मान्यवरांच्या हस्ते वटवृक्षाची लागवड करून करण्यात आला. या कार्यक्रमाला पाडळी गावचे सरपंच गहिनाथ पाखरे,रामदास हांगे,पौंडूळ गावचे सरपंच शिवमूर्ती सानप, खालापुरी गावचे उपसरपंच ज्ञानेश्वर परजणे शिरपूर गातचे सरपंच बबन भाई शेख, किरण परजणे मंडळ अधिकारी केकान साहेब,ग्रामविकास अधिकारी बी बी पोकळे साहेब इत्यादी उपस्थित होते.

## बेलेश्वर महाराज संस्थानला महाराष्ट्रात घेऊन जावे – प्रकाश महाराज बोधले

बीड ।प्रतिनिधी बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगावची सचिव पदाची सूत्रे महंत तुकाराम महाराज भारती यांच्या हाती सोपवण्यात आले आहेत. त्यांची निवड व अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून संस्थांवर भव्य किर्तन सोहळा संपन्न झाला. सुप्रसिद्ध कीर्तनकार एकनाथ महाराज गाडे यांचे सुंदर किर्तन झाले या कार्यक्रमाला महंत महादेवानंद भारती महाराज,श्री ह भ प महंत प्रकाश महाराज बोधले, श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प महंत जनार्दन महाराज शिंदे, श्री महामंडलेश्वर १००८ स्वामी त्रिवेंद्रानंद सरस्वतीजी, वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवे बापू , महंत धर्मराज महाराज सामनगावकर, ताल मार्तंड केशव महाराज जगदाळे गुरुजी,श्री ह भ प भक्तीदास महाराज शिंदे,भागवताचार्य प्रेमानंद महाराज नगरकर , श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश महाराज जाधव, श्री ह भ प नवनाथ महाराज नाईकवाडे, श्री ह भ प अंगद महाराज सातपुते, रंजीत महाराज शिंदे यांच्यासह महाराष्ट्रातील नामांकित कीर्तनकार गायक वादक मंडळी व हजारो भाविक उपस्थित होते. लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे महान तपोनिधी साधू श्री १००८ ईश्वर भारती महाराज यांच्या परंपरेचे रत्न महंत तुकाराम महाराज भारती यांच्याकडे संस्थांच्या सचिव पदाची सूत्रे सोपवण्यात आली आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त एक दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील सर्व भाविक मंडळी उपस्थित होते. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार एकनाथ महाराज गाडे यांचे सुश्राव्य हरिकीर्तन संपन्न झाले, त्यानंतर अभिष्टचिंतन सोहळ्याला सुरुवात झाली, सुरुवातीला पेढे तुला करण्यात आली, त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महंत तुकाराम महाराज भारती यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त भव्य सत्कार करण्यात आला, यावेळी महादेवानंद भारती यांचाही सत्कार करण्यात आला.यावेळी मनोगत व्यक्त करताना श्री ह भ प्रकाश महाराज बोधले म्हणाले की बेलेश्वर संस्थानचे अध्यात्मच सोन सांभाळणारा श्रेष्ठ असतो.महंत महादेवानंद भारती महाराज यांनी हे सांभाळून ठेवला आहे. महंत तुकाराम महाराज यांनी बेलेश्वर संस्थांची महती महाराष्ट्रभर घेऊन जावी अशी अपेक्षा व्यक्त केली. बेलेश्वर संस्थान हे सोनं आहे त्या कोंदणात महंत तुकाराम महाराज यांच्यासारखे रत्न मिळाल. तुकाराम महाराजांनी संस्थांची सेवा केली दिंडी तसेच भाविकांना एकत्रित करण्याचे काम केले आहे अगोदर सेवा केली त्यानंतर कारभार हाती सोपवला.भाविक भक्तांनी ही संस्थांच्या वाटचालीमध्ये सर्वांनी सहकार्य करावे. सर्व मान्यवर संतांचे आशीर्वाद तुकाराम महाराज भारती यांच्या पाठीशी आहेत. अशा भावना महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी व्यक्त केल्या.सेवाभावातून बेलेश्वर संस्थांची महती आणि विकासही मोठ्या प्रमाणात झालेला आहे. निस्वार्थपणाने परमार्थासाठी जीवन समर्पित करणारे महात्मे मिळाल्याने देवस्थानची वाटचाल

## ढेकनमोह - जुजगव्हाण शिव पानंद रस्ता तहसीलदार शेळके यांनी केला खुला

### एक वर्षा पासून सुरु असलेला वाद अखेर मिटला

.तहसीलदार शेळके यांनी गुरुवारी (१७ जून रोजी ) ढेकणमोहा ग्राम पंचायतला भेट देऊन गावातील लोकांच्या समस्या व पिक विमा संदर्भात अडचणी जाणून घेतल्या . गावातील लोकांचे फार्मर आयडी काढुन घेण्याचे आवाहन केले . ढेकणमोहा-जुजगव्हाण शिवेवरुन जाणारा अंतर्गत वादाने अडवलेल्या रस्त्याची तक्रार प्रलंबित होती . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सुनावणी घेवुन रस्ता खुला करण्याचा आदेश दिला होता . तथापि काही शेतकऱ्यांनी आपसात असलेल्या वादामुळे शिवरस्ता होऊ दिला नव्हता सुमारे तीन किलोमीटर रस्त्यांपैकी एक किलोमीटर रस्ता लोकसहभागातून करण्याचे राहून गेले असल्याचे शेतकऱ्यांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिले कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके यांच्या पुढाकारातून व सस्ती अदालत या मोहिमेअंतर्गत हा रस्ता तात्काळ सामोपचाराने या वेळी खुला करण्यात आला .
महाराष्ट्राचे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अनेक हिताचे निर्णय घेतले आहेत . बीडचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अधिकाऱ्यांना नियमानुसार कोणालाही न घाबरता नागरिकांची ,शेतकऱ्यांची कामे तात्काळ करणे बाबतची निर्देश दिलेले आहेत . विभागीय आयुक्त दिलीप जितेंद्र पापळकर यांनी ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न निर्माण झालेले असतील त्या ठिकाणी महसूल विभागाने वादी आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करून सामोपचाराने रस्त्याचे प्रश्न महसूल अधिकाऱ्यांमार्फत सोडवण्यास सुरुवात केली आहे .बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जनता दरबार घेऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जागेवर सोडवत असल्याचे चित्र दिसत आहे . बीड जिल्ह्यात प्रशासन लोकोपयोगी कार्य इतक्या मोठ्या प्रमाणात केल्याचे पहिल्यांदाच दिसून येत आहे . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी तहसीलदारांना शेतकऱ्यांची रस्त्याची कामे तातडीने करून द्यावीत असे सांगत असतात . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव ह्या सर्वसामान्य जनतेप्रती अत्यंत कनवाळू आहेत . गरीब शेतकऱ्यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अडविता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असतो . ग्राम महसुल सज्जा ढेकणमोहा अंतर्गत येणाऱ्या मौजे ढेकणमोहा व जुजगव्हाण या दोन गावांच्या शिवेवर असणाऱ्या ब्रम्हनाथ वस्ती कडे जाणारा पाणंद रस्त्याच्या मागणीवरून अर्जदार






दादासाहेब नामदेव थापडे व इतर ७ जण यांनी केली होती . ढेकणमोहा - नाळवंडी रोडपासुन ते जुजगव्हाण तलाव पर्यंत जाण्यायेण्यासाठी पूर्वापार हा दक्षिण - उत्तर जाणारा रस्ता मागील अनेक वर्षापासुन गुरे-जनावरे व शेतकरी या मार्गावरून आपल्या शेतीशी निगडीत उद्योग , व्यवसाय करत आहेत . गैरअर्जदार यांनी व इतर काही शेतकऱ्यांनी हा रस्ता पूर्वापार चालत आलेला आहे परंतु तो रस्ता पुर्णपणे आमच्या बाजुच्या शेत जमिनीमधुन काढलेला आहे असे म्हणुन रस्ताचे सुरू असलेले काम बंद करुन खडी व मुरूम टाकु न देता तो मध्येच अडवला होता . गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार तहसीलदार यांनी स्वतः स्थळ पाहणी केली व अर्जदार व गैरअर्जदार यांना रस्त्याचे व दळणवळणाचे महत्त्व सांगुन रस्त्यामुळे शेती उत्पादन कसे वाढवावे याकडे लक्ष देण्यास सांगितले . त्याचे महत्त्व शेतकरी यांना कळाले . दोन्ही बाजुच्या शेतकरी यांना सामोपचाराने समजावून सांगितले व मागील वर्षाभरा पासून चालत आलेला वाद मिटवला . जाण्या- येण्यासाठी ढेकणमोहा व जुजगव्हाण या गावच्या शिवावरुन २० फुटाचा रस्ता करावा अशी भूमिका शेतकरी यांनी घेतली . त्यानुसार हा रस्ता करून देण्यात आला .तहसीलदार शेळके यांनी नाळवंडीचे मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे व ग्राम महसूल अधिकारी जावेद शेख , ढेकणमोहा यांना सस्ती अदालत मोहिमेअंतर्गत स्थळपाहणी करण्याबाबत यापूर्वीच आदेशित केले होते . तहसीलदार शेळके यांच्या आदेशानंतर स्थानिक शेतकरी यांनी रस्ता खुला करून देण्यास कुठेही अडथळा निर्माण न करता सहकार्य केले. यावेळी कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके , ग्राम महसूल अधिकारी जावेद शेख , गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच शिवाजी गाडीवान , ग्राम विकास अधिकारी बाबुराव तांदळे , उपसरपंच परमेश्वर थापडे , तंटा मुक्ती अध्यक्ष कैलास देवकते , पोलीस जमादार चत्रभुज डापकर , ग्राम पंचायत सदस्य सतिश देवकते , अनंत करांडे , बळीराम थापडे , रावसाहेब थापडे , संजय शिंदे , मिलींद शिंदे , चत्रभुज थापडे , सिद्धेश्वर थापडे , दादासाहेब थापडे , गणेश थापडे , महादेव थापडे , नितीन थापडे , बापुराव थापडे , संदिपान थापडे , शिवाजी जाधव , भारत देवकते , गणेश गलांडे , रमेश गलांडे , दादा जाधव , भगवान थापडे , बालासाहेब थापडे तसेच आजू बाजूचे शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते . यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके बीड यांचे आभार मानले .

# मोठी बातमी! फडणवीस आणि ठाकरेंमध्ये अर्धा तास बैठक, नेमकी कशावर चर्चा?

राजकीय वर्तुळातून मोठी बातमी समोर येत आहे, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे हे देखील उपस्थित होते. दोन्ही नेत्यांमध्ये अर्धा तास चर्चा झाली. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या दालनामध्ये ही महत्त्वाची बैठक पार पडली आहे. बुधवारी देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निरोपसमारंभाप्रसंगी जोरदार टोलेबाजी केल्याचं पाहायला मिळालं होतं. फडणवीस यांनी यावेळी विधानभवनात बोलताना उद्धव ठाकरे यांना थेट सत्तेत सहभागी होण्याचं निमंत्रण दिलं. तुम्हाला इकडे स्कोप आहे, तुम्ही येऊ शकता, असं त्यांनी म्हटलं होतं. दरम्यान फडणवीसांच्या या ऑफरनंतर आज उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची बैठक पार पडल्यानं राजकीय वर्तुळात चर्चेला चांगलंच उधाण आल्याचं पाहायला मिळालं. नेमकी कशावर चर्चा



आज उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, या भेटीला आदित्य ठाकरे देखील उपस्थित होते. दोन्ही नेत्यांमध्ये अर्धातास चर्चा झाली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी फडणवीसांना 'हिंदीची सक्ती हवीच कशाला' हे पुस्कत देखील भेट दिलं आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार विरोधी पक्ष नेतेपद, त्रिभाषा सूत्र आणि हिंदीसक्ती या संदर्भात या बैठकीत चर्चा झाली आहे. हर्षवर्धन सपकाळ भेटीसाठी दाखल दरम्यान दुसरीकडे आजच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे देखील उद्धव ठाकरे यांची भेट घेणार आहेत. अंबादास दानवे यांच्या कार्यालयात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष उद्धव ठाकरेंच्या भेटीसाठी दाखल झाले आहेत. जनसुरक्षा विधेयकाबाबतीत महाविकास आघाडी राज्यपालांची भेट घेण्याचे नियोजन करत असून, याबाबत चर्चा करण्यासाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि काँग्रेसचे नेते उद्धव ठाकरे यांच्या भेटीसाठी दाखल झाले आहेत. दरम्यान दुसरीकडे मुंबईत विजयी मेळावा पार पडल्यानंतर शिवेसना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मसने प्रमुख राज ठाकरे यांच्या युतीसंदर्भात देखील जोरदार चर्चा सुरू आहे, मात्र युतीसंदर्भात राज ठाकरे हे सावध भूमिका घेत असल्याचं पाहायला मिळत आहे.

## जड वाहणासाठी १९ ते २१ जुलै पर्यत पर्यायी मार्ग वापरण्याचे पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल यांचे आदेश

अंबड ।प्रतिनिधी श्री गजानन महाराज संस्थान शेगाव या न्यासाची श्री ची पालखी पायदळवारी पालखी, पंरपरेनुसार पंढरपुर येथुन परतीच्या मार्गावर असुन सदर दिंडी मध्ये ७००ते ८०० वारकरी सहभागी आहेत. सदर पायी दिंडी ही शनिवार दिनांक १९ जुलै २०२५ रोजी जालना जिल्हयात प्रवेश करणार असुन दिनांक १९ व २० जुलै या दोन दिवस गोंदी व अंबड हददीत मुक्कामी राहुन दिनांक २१ जुलै २०२५ रोजी गोलापांगरी मार्गे जालना शहराकडे प्रयान करणार आहे.भाविकेच्या व जनतेच्या सुरक्षीततेसाठी व वाहतुकीच्या सुनियमनासाठी सदर मार्गावरील अवजड वाहानांना पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश जालना पोलीस अधिक्षक अजय कुमार बन्सल यांनी दिले आहे. १) दिनांक १९ जुलै २०२५ शनिवार रोजी सकाळी ०८.०० वाजेपासून ते २३.०० वाजे पर्यत हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरील उडडानपुलाचे खालुन व बाजुने अंबडकडे येणारी अवजड वाहने थांबवुन, सदर वाहने पाचोड अंबड मार्गे जालनाकडे जातील व जालनाकडु न शहागडकडे जाणारी वाहने अंबड-पाचोडमार्गे शहागडकडे जातील. २) दिनांक २० जुलै २०२५ रविवार रोजी सकाळी ०३.०० वाजेपासुन ते २३.०० वाजे पर्यत हरीओम हॉटेल वडीगोद्री समोरी उडडानपुलाचे खालुन व बाजुने अंबडकडे येणारी सर्व अवजड वाहने थांबवुन, पाचोड जामखेड फाटा- जामखेड- किनगाव चौफुली- बदनापुर मार्गे जालनाकड े जातील. तसेच जालनाकडु न येणारी वाहने बदनापुर-किनगाव चौफली पाचोड मार्गे शहागडकडे जातील, शहापुर ते शहागड व अंबड ते पाचोड मार्गावरील गावातील अवजड वाहनांनी वरील पर्यायी मार्गाचा वापर करावा, तसेच पारनेर फाटा ते औरंगाबाद हायवे पर्यंतच्या गावातील अवजड वाहनांनी वरील पर्यायी मार्गाचा वापर करावा.३) दिनांक २१ जुलै २०२५ सोमवार रोजी सकाळी ०३.०० वाजेपासून ते २३.०० वाजे पर्यत हरीओम हॉट ेल वडीगोद्री समोरील उडडानपुलाचे खालुन व बाजुने अंबडकडे येणारी सर्व अवजड वाहनांना प्रवेश बंद करून, सदर वाहने वडीगोद्री पाचोड- जामखेड फाटा जामखेड किनगाव चौफुली बदनापुर मार्गे जालनाकड े जातील. तसेच जालनाकडु न येणारी वाहने बदनापुर- किनगाव चौफुली जामखेड जामखेड फाटा पाचोड मार्गे शहागडकडे जातील.४) तसेच अंबडकडुन जालनाकडे जाणारी अवजड वाहने ०३.०० ते २३.०० वाजेदरम्यान बंद करून सदर वाहने किनगाव चौफुली बदनापुर मार्गे जालनाकडे जातील व जालनाकडुन अंबडकडे येणारी अवजड वाहने बदनापुर-किनगाव चौफुली- जामखेड- पाचोड मार्गे शहागडकडे जातील.५) दिनांक १९ जुलै ते २१ जुलै २०२५ रोजी जालनाकडू न घनसावंगीकड े जाणारी वाहने, रोहनवाडी सुतगिरणी मार्ग घनसावंगीकडे जातील

## विहिरीत उडी घेऊन ५२ वर्षीय शेतकऱ्याची आत्महत्या.....!

पैठण तालुक्यातील गेवराई मर्दा येथील घटना पैठण (प्रतिनिधी) नापिकी तसेच उचलेल्या खाजगी व सरकारी कर्जाची परतफेड होत नसल्याने पैठण तालुक्यातील गेवराई मर्दा येथील अल्पभूधारक शेतकऱ्याने स्वत:च्या शेतात फवारणी करायला जातो अशे सांगून गेले व विहरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना आज गुरुवार रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास उघडकीस आली घडली. शेतकरी भगवान शेषराव ढाकणे असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांना गेवराई मर्दा शिवार गट नंबर ५३ मध्ये तिन एकर शेती आहे.पैठण तालुक्यातील गेवराई मर्दा येथील भगवान शेषराव ढाकणे वय ५२ वर्ष यांना पत्नी,मुलगी, मुलगा आई असुन थोडया शेतीवर त्यांचा उदरनिर्वाह सुरु होता.शेतातील पिकाच्या नापिकीमुळे उत्पन्न ही होत नव्हते व त्यांनी काही खाजगी सुद्धा कर्ज घेतलेले होते या सर्व प्रकाराला ते मागील बऱ्याच दिवसांपासून कंटाळले होते.अखेर त्यांनी आपली जीवनयात्रा संपविण्याचा निर्णय घेवुन रोजी स्वत:च्या शेतात विहरीत उडी घेऊन आत्महत्या केली.या घटनेची नोंद पाचोड पोलीस ठाण्यात घेण्यात आली असुन पुढिल तपास ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली रवींद्र आंबेकर हे करीत आहेत.त्यांच्या पार्थिवावर सायंकाळाच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले.---



बीड-सध्या बाज विणण्याची कला दुर्मिळ होत चालली आहे, तरीही ग्रामीण भागात बोटावर मोजण्या इतपत कारागीर शिल्लक आहेत, बाज विणण्याचा कामात व्यस्त असलेल्या रायमोह येथील एका कारागीराचे सुधाकर जाधव यांनी टिपलेले हे छायाचित्र...

## पाटोद्यात शासन निर्णयाला केराची टोपली? पारधी समाजातील दिव्यांग युवकांवर अन्याय जीलानी शेख यांचा सवाल

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा शहरातील पारधी समाजातील दिव्यांग युवकांला २५ जुलै २००७ च्या शासन परिपत्रकानुसार २०० चौ.फुट जागा अत्यल्प भूभाड्यावर विना लिलाव देणे अपेक्षित असताना, आजतागायत त्यांना हक्काचे घर मिळालेले नाही, ही अत्यंत दुर्दैवी व दु:खद बाब असल्याची संतप्त प्रतिक्रिया दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष जीलानी शेख यांनी व्यक्त केली आहे.गेल्या अनेक वर्षांपासून शासनाचे परिपत्रक असूनही स्थानिक प्रशासन आणि नगरपंचायत यांच्याकडून दुर्लक्ष केले जात आहे. शेकडो दिव्यांग व्यक्ती



आजही घराविना, उघड्यावर किंवा अस्थायी निवाऱ्यांमध्ये राहतात, हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने लाजिरवाणे आहे, असा आरोपही शेख यांनी केला. ङ्गदिव्यांग हक्कासाठी आम्ही झगडतोय, सरकारच्या परिपत्रकाचे काय उपयोग जर अंमलबजावणीच होत नसेल? पारधी समाजातील आमचे दिव्यांग बांधव अजूनही घराच्या प्रतीक्षेत आहेत, हे शासनाच्या अपयशाचे प्रतीक आहे,जीलानी शेख, अध्यक्ष, दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र ते पुढे म्हणाले की, शासनाने जारी केलेल्या २५ जुलै २००७ च्या परिपत्रकात स्पष्ट उल्लेख आहे की, दिव्यांग नागरिकांना अत्यल्प भूभाड्यावर २०० चौ. फूट क्षेत्रफळाची जागा विना लिलाव द्यावी. परंतु याचे पालनच होत नसल्यामुळे दिव्यांग सम ाजात प्रचंड नाराजी आहे.या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस बजावून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी देखील करण्यात आली असून, येत्या काळात जर योग्य कार्यवाही झाली नाही तर दिव्यांग संघर्ष समिती राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# धन्यवाद पोलीस अधीक्षक काँवत साहेब..!

## अंबाजोगाईला शरद जोगदंडांसारखा पोलीस अधिकारी दिलात - अंबाजोगाईकर

अंबाजोगाई / सुनील सिरसाट बीड जिल्हा नेहमीच लक्षवेधी ठरलेला आहे. कारण राजकीय असो की सामाजिक असो, शैक्षणिक असो की कायदा व सुव्यस्थचे असो. बीड जिल्ह्यातील कायद्या व सुव्यवस्था बदलण्यासाठी कित्येक अधिकारी आले आणि गेले. परंतु प्रचंड राजकीय हस्तक्षेपाई कुणीही बीड जिल्ह्याचे बदनाम नाव चांगले केले नाही. अशाच काहीशा वातावरणात बीड जिल्हा गेल्या अनेक वर्षांपासून होरपळतोय. परंतु एका गुन्हेगारी निमित्ताने मोठा विश्वास दाखवून आणलेले पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी मात्र बीड जिल्ह्याची बदनामी व जिल्ह्याला लागलेले गालबोट कसे कमी करता येईल याचा प्रमाणिक प्रयत्न केला आणि करत आहेत. त्याबद्दल एस.पी.साहेब खरच आपले मनापासून धन्यवाद....!सातत्याने प्रचंड बदनाम असलेला नव्हे बीड म्हणजे मिनी बिहार असे म्हटले तर वावगे वाटण्याचे कारण नाही ईतका या ना त्या कारणाने बदनाम करून ठेवलेला बीड जिल्हा मस्साजोग प्रकरणाने तर केवळ जिल्हाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्र हवालदिवाल झाला. त्यामुळे इतर कारणांपेक्षा महत्वाची कायदा व सुव्यवस्था ऑलरेडी बिघडलेली असताना मस्साजोग प्रकरणाने तर बीड हे केवळ राज्यापुरते मर्यादित न राहता संपूर्ण भारत देशात परिचित झाले. जिल्ह्यातील वाढता राजकीय हस्तक्षेप पाहता गृहखाते व सर्वानुमते नवनीत कावतांसारखा तरुण तडफदार आणि कर्तव्यदक्ष दबंग पोलीस अधीक्षक जाणीवपूर्वक बीडला आणला गेला. आणि हा दृढ विश्वास अल्पावधीतच विश्वासपात्र ठरला. नवनीतांनी आपल्या बौद्धिक चातुर्याने आणि कौशल्याच्या हातोटीने एकंदरीत बीड जिल्ह्यातील राजकीय हस्तक्षेप तर बऱ्यापैकी कमी केलाच. परंतु पूर्णतः नसली तरी सदैव केवळ अंशत: बदल झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती आजमीतिला बऱ्यापैकी बदलून अलीकडच्या तीन-चार महिन्यात बीड जिल्ह्याला ज्या प्रमाणात कलंक लागलेला आहे तो कलंक बऱ्यापैकी पुसून टाकण्याचे काम केले आहे.बीड जिल्ह्यातील एकंदरीत कायदा व सुव्यवस्थेला नेहमीच अंबाजोगाई शहराची कायदा व सुव्यवस्था गुणांकनासाठी कामाला आलेली आहे. परंतु अलीकडील पाच-सहा वर्षात तीही बऱ्यापैकी बिघडल्याने अंबाजोगाईकरही मोठ्या चिंतेत होते. परंतु नवनीत काँवत साहेबांनी शरद जोगदंड नावाचे छोटे काँवत पोलीस निरीक्षक म्हणून आंबेजोगाईला पाठवले आणि केवळ दोन महिन्याच्या आत शशहरातील सर्व राजकीय-सामाजिक-व्यापारी वर्गातील वा अन्य कुठल्याही स्तरातील प्रतिष्ठित आणि विश्वासपात्र मंडळींना आपलेसे करत पो.नि.शरद जोगदंड यांनी शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा जो प्रामाणिक प्रयत्न सुरू केलेला आहे तो एवढ्या कमी वेळात आजमीतिला बऱ्यापैकी यशस्वी होताना दिसतोय. यावरून एवढे मात्र निश्चित होत आहे की पोलीस अधिकारी हा केवळ भ्रष्टाचारी-डांबरट राजकीय दबावाखाली येणारा आणि तोंडचोपडा असला नाही पाहिजे. तर तो प्रमाणिक-अभ्यासू-अनुभवी आणि सर्वसमावेशक असला पाहिजे. पोलीस प्रशासन तर भ्रष्टाचाराचे माहेरघर आहे. हे केवळ महाराष्ट्रच नाही तर भारतभर मान्यच आहे. तेंव्हा तळ राखणारा पाणी तर पिणारच. फक्त त्याचे प्रमाण ज्याचे त्याने ठरवायचे असते. तेंव्हा शरद जोगदंड कसे आहेत, ते खरंच किती पैसे खातात असे प्रश्न उद्धवण्यापेक्षा ते कुठल्या पद्धतीने काम करत आहेत. त्यांचे काम कसे आहे आणि शहरातील सर्व स्तरातील लोकांनी त्यांच्या या कामासाठी त्यांना खरोखरच कितपत सहकार्य केले पाहिजे. ते कौतुकास पात्र असतील तर त्यांचे कौतुकही झाले पाहिजे असाच काहीसा विचार करून जर सर्वांनी शरद जोगदंड यांना येणाऱ्या काळात मनापासून मदत केली तर, आज प्रत्येक आंबेजोगाईकर म्हणतो आहे की हा अधिकारी येणाऱ्या बदलीच्या काळापर्यंत नक्कीच आंबेजोगाईचा कायदा व सुव्यवस्थेचा चेहरा बदलल्याशिवाय राहणार नाही. तेंव्हा आंबेजोगाईकरांचा विश्वास आणि आंबेजोगाईकरांच्या विश्वासास पात्र शरद जोगदंड यांचा कर्तव्यदक्षपणा आणि त्यांचे काम किती विश्वासपात्र ठरणार हे मात्र येणारा काळच ठरवेल. परंतु तोपर्यंत त्यांचे अल्पशा कामावरूनच लेकराचे पाय जसे पाळण्यात दिसतात म्हटले जाते. तसे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांचे काम आजमीतीला तरी सर्वसामान्यांपासून ते धनदांडग्यांपर्यंत आंबेजोगाईकरांच्या आशा पल्लवीत करत आहे. त्यामुळे ते तर शहरवासीयांच्या आणि पत्रकारांच्या अभिनंदन-कौतुकास पात्रच आहेत. परंतु त्याबरोबरच अनेक हिऱ्यातून अंबाजोगाईला शरद जोगदंड यांचा सारखा पोलीस अधिकारी दिल्यामुळे अगोदर बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत साहेबांचे मनापासून धन्यवाद.! असाच सुर अंबाजोगाई शहरात सध्या सर्वत्र एकावयास मिळत आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com